पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शहर सुधारणा समिति

**कार्यपत्रिका क्रमांक - ९**

सभावृत्तांत

दिनांक - ०३/१२/२०१४ वेळ - दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०३/१२/२०१४** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) **मा. छाया जगन्नाथ साबळे - सभापती**
२) मा. आर.एस.कुमार
३) मा. उल्हास शेट्टी
४) मा. नेटके सुमन राजेंद्र
५) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
६) मा. लोखंडे गोरक्ष जाकाराम
७) मा. जवळकर वैशाली राहुल
८) मा. अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.दंडवते - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.गट्टुवार - कार्यकारी अभियंता, मा.ऐवले - समाज विकास अधिकारी, मा.शिंपी - नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२ - आरक्षण बदलणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर, मा.आशा सुर्यवंशी, मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३ - सांगवी वॉर्ड क्र.५९ मधील मनपा विकास आराखडयामध्ये नमुद केलेले रस्ते रद्द करणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर, मा.आशा सुर्यवंशी, मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४ - आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे या आरक्षणाखालील जागा विकसित करण्यास समावेशक आरक्षणांतर्गत परवानगी मिळणेबाबत - मा.आर.एस.कुमार, मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर, मा.आशा सुर्यवंशी, मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक - मा.उल्हास शेट्टी अनुमोदक - मा.आशा सुर्यवंशी

मा.शहर सुधारणा समितीची दिनांक ०३/२१/२०१४ ची सभा बुधवार दिनांक १०/१२/२०१४ रोजी दुपारी ३.३० पर्यंत तहकुब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती -** बुधवार दिनांक १०/१२/२०१४ रोजी दुपारी ३.३० पर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

( **छाया जगन्नाथ साबळे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - ९**

सभावृत्तांत

( दिनांक ०३/१२/२०१४ ची तहकूब सभा )

दिनांक - १०/१२/२०१४ वेळ - दुपारी ३.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची दिनांक ०३/१२/२०१४ ची तहकूब सभा बुधवार दिनांक **१०/१२/२०१४** रोजी दुपारी **३.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) **मा. छाया जगन्नाथ साबळे - सभापती**
२) मा. आर.एस.कुमार
३) मा. नेटके सुमन राजेंद्र
४) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
५) मा. आसवाणी सविता धनराज
६) मा. अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.गावडे - सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.गट्टूवार - कार्यकारी अभियंता, मा.चौरे, मा.पुजारी मा.तुपसाखरे, मा.वाघ - उप अभियंता, मा.बहाद्दरपुरे - सहा.समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

ठराव क्रमांक - ३५ विषय क्रमांक - १
दिनांक - १०/१२/२०१४ विभाग - नागरवस्ती विकास योजना
सुचक - मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.अश्विनी चिंचवडे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नाவियो/२/कावि/१४१/२०१४, दि.२०/११/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी जाहिरप्रकटनाद्वारे अर्ज मागविले असता मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत एकूण ३९६२ अर्ज प्राप्त झाले असून या अर्जाची तपासणी प्रक्रीया चालू असून त्यामध्ये अंदाजे ६०% अर्ज पात्र होण्याची शक्यता वाटते. म्हणजेच प्राप्त अर्जापैकी अंदाजे एकूण २४०० अर्ज पात्र होतील असे मत आहे. म्हणजेच या दोन्ही आर्थिक वर्षासाठी किमान एकूण ४७७५ सायकली खरेदी करणे अपेक्षित असल्याने या दोन्ही आर्थिक वर्षासाठी किमान अंदाजे एकूण ५००० सायकली खरेदी कराव्या लागणार आहेत. सदरच्या सायकली गतवर्षीच्या खरेदी किंमतीमध्ये १०% दरवाढ विचारात घेता अंदाजे रक्कम रुपये ३,८३०/- प्रती नग या दराने खरेदी कराव्या लागतील त्यानुसार

एकूण रक्कम रुपये १,९१,५०,०००/- ( अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एक्याण्णव लाख पन्नास हजार फक्त ) इतका खर्च अपेक्षित आहे. या योजनेसाठी सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात अंदाजपत्रकामध्ये रक्कम रुपये ६७,५०,०००/- एवढी तरतूद आहे. उपलब्ध तरतूदीचा विचार करता रक्कम रुपये -१,२४,००,०००/- ( अक्षरी रक्कम रुपये एक कोटी चोवीस लाख फक्त ) इतकी तरतूद कमी पडणार असून सदरची तरतूद सुधारित अंदाजपत्रकात करणेत येईल. तरी सदरच्या सायकली खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ३६ विषय क्रमांक - २

दिनांक - १०/१२/२०१४

सुचक - मा.सुमन नेटके अनुमोदक - मा.आर.एस.कुमार

संदर्भ : मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

मौजे मोशी गावाचे ग्रामदैवत श्री.नागेश्वर महाराज असून ग्रामस्थ भंडा-याचा उत्सव गेली अनेक वर्षे करीत आहेत व सदर उत्सवास धार्मिक परंपरा आहे. सदर उत्सवाचा कार्यक्रम गावाच्या मध्यभागी विकास आराखडयातील आ.क्र.१/१७७ बस टर्मिनल या जागेवर होत आहे. सद्यस्थितीत गावामध्ये कोठेही मोकळी जागा नसल्यामुळे गावातील सर्व धार्मिक कार्यक्रम याच जागेवर करणेत येत असून ग्रामिण परंपरा जगविण्यासाठी सदर जागेवरील बस टर्मिनलचे आरक्षण रद्द करुन खेळाचे मैदानाचे आरक्षण केल्यास सदर जागेचा वापर मुलांना खेळण्यासठी तसेच धार्मिक कार्यक्रमांसाठी वापरता येणे शक्य आहे व तशी ग्रामस्थांची मागणी आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेतील जकात नाके रद्द झाल्यामुळे मौजे मोशी येथील आ.क्र.१/१७० जकात नाक्यासाठी १.६० हेक्टर क्षेत्र आरक्षित असून सदर आरक्षणातील ०.७५ आर महानगरपालिकेच्या ताब्यात आले असून उर्वरित क्षेत्र ताब्यात येण्याच्या मार्गावर आहे. तरी सदर मोशी गावातील आ.क्र.१/१७७ बस टर्मिनलची जागा गावाच्या मध्यभागी व श्री.नागेश्वर महाराज समाधीच्या बाजूला असल्यामुळे जकात नाक्याची ताब्यात आलेल्या आ.क्र.१/१७० मधील जागेमध्ये सदर आरक्षण स्थलांतर करावे किंवा रद्द करुन खेळाच्या मैदानासाठीचे आरक्षण प्रस्तावित करणेत यावे. प्रस्तावित या आरक्षणास म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३७ विषय क्रमांक - ३

दिनांक - १०/१२/२०१४

सुचक - मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.आर.एस.कुमार

संदर्भ : मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर, मा.आशा सुर्यवंशी, मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव.

सांगवी वॉर्ड क्र.५९ मधील मनपा विकास आराखडयामध्ये खाली नमुद केलेले रस्ते

| अ.क्र. | डी.पी.मधील नमुद रस्ता | जवळील खुण |
|---|---|---|
| १ | सर्व्हे नं.१४ ते २४ पर्यंत ग्रीन प्लेट लगतचा रस्ता | मधुबन कॉलनी मधील १२.०० मी.डी.पी.रस्ता |
| २ | सर्व्हे नं.९ ते १२ (आ.क्र.३२१) चे लगतचा ९ मी. रस्ता | ढोरेनगर मधील ९ मी.नियोजित रस्ता |

या भागामध्ये उपलब्ध असणारे इतर रस्ते विकसित झाले असल्याने व वरील रस्त्यांची आवश्यकता भासत नसल्याने विकास आराखडयातून रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३८ विषय क्रमांक - ४

दिनांक - १०/१२/२०१४

सुचक - मा.आर.एस.कुमार अनुमोदक - मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ : मा.आर.एस.कुमार, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे बांधण्याचे योजिले आहे. तथापि अजूनही अशा नागरिकांची निकड पुर्ण होऊ शकलेली नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखडयात ब-याच जागा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरिता राखून ठेवलेल्या आहेत. परंतु त्या अजून विकसीत झालेल्या नाहीत अशा आरक्षित जागा महापालिकेस जमीनमालकांकडून भूसंपादनाच्या माध्यमातून किंवा टीडीआरद्वारे ताब्यात घेऊन विकसित कराव्या लागतील. सदर जागा ताब्यात घेणे व नंतर बांधकाम करणे या बाबींसाठी महापालिकेस बराच कालावधी व कोटयावधींचा खर्च येऊ शकतो. महापालिकेच्या सध्याच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार काही आरक्षणे ठराविक बांधीव हिस्सा मनपास विनामोबदला महापालिकेस देण्याच्या अटीवर स्वत: जमीनमालक समावेशक आरक्षणाच्या धर्तीवर विकसित करु शकतात. शासनाच्या सन १९९४ च्या निर्णयानुसार विकास आराखडयातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे व अशा प्रकारच्या राखीव जागा स्वत: जमीनमालक समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकसित करु शकतात. त्यामुळे विकास आराखडयातील आरक्षित जागेचा मनपास कोणतीही आर्थिक झळ न पोचता विकास होऊ शकतो व त्यासाठी त्याबदल्यात ठराविक बांधीव क्षेत्रही महापालिकेस विनामोबदला मिळू शकते. तरी शासनाच्या १९९४ च्या समावेशक आरक्षणांबाबतच्या निर्णयास अनुसरुन विकास आराखडयात आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे यासाठी आरक्षित जागांसाठी आरक्षित जागेच्या एकूण बांधकामापैकी १५ टक्के बांधीव क्षेत्र मनपाला

विनामोबदला महापालिकेस देण्याच्या अटीवर व तेवढया क्षेत्राचा जादा चटई क्षेत्र जमीन मालकास अनुज्ञेय करुन परवानगी देणेस मान्यता देणेत येत आहे. अशा निर्णयाची अंमलबजावणी केल्यास विकास आराखडयातील अशा आरक्षणाच्या ब-याच जागा या धर्तीवर विकसित होऊ शकतील, सर्व सामान्य नागरिकांना शहरातील वेगवेगळया ठिकाणी घरे उपलब्ध होऊ शकतील व त्यासाठी महापालिकेवर कोणताही आर्थिक बोजा पडणार नसलेने मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **छाया जगन्नाथ साबळे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९९५/२०१४
दिनांक : ११/१२/२०१४

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Shahar Sudharana-14-15\proceeding 9_Shahar Sudharna.doc